महाराष्ट्र शासन

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,जळगांव

श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर,सिरसोली रोड, जळगाव -४२५००२

ईमेल -gacjalgaon@gmail.com

---

जा.क्र.शाआमज/ / दि. ०९ /०३ /२०२१

**<u>महाविद्यालय स्तरावरील प्रवेश फेरीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सुचना.</u>**

१) सक्षम प्राधिकारी राज्य सीईटी कक्ष, मुंबई यांनी प्रसिध्द केलेल्या नीट-युजी नोटीस क्र.-३७ अन्वये निर्देशित केल्यानुसार या महाविद्यालयातील रिक्त जागासाठी संस्थास्तरीय प्रवेश फेरीसाठी प्राप्त अर्जानुसार तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यांत येत आहे.

२) सदर प्रतिक्षा यादीवर आक्षेप असल्यास संवधितांनी पुराव्यानिशी यादी प्रसिध्द झाल्यापासुन एक तासाच्या आत लेखी अर्ज (gacjalgaon@gmail.com) या मेलवर सादर करावा तसेच सदर विहित मुदतीत कोणाचाही आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर तात्पुरती गुणवत्ता यादी अंतिम समजण्यात येईल.

३) निवड यादीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे त्यांचा तात्पुरत्या निवड यादीत समावेश केलेला आहे. परंतु प्रत्यक्ष प्रवेशाच्यावेळी संबंधित विद्यार्थ्यांनी सर्व मुळ प्रमाणपत्रे व शैक्षणिक शुल्काचे डी.डी सादर करणे आवश्यक राहील त्याशिवाय त्याचा प्रवेश निश्चित केला जाणार नाही.

४) सक्षम प्राधिकारी सीईटी.कक्ष मुंबई यांनी नोटीस क्र - ३७ अन्वये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना रुजु होण्यासाठी विहित केलेल्या कालावधीतच महाविद्यालयात सर्व मुळ कागदपत्रे व शैक्षणिक शुल्कासह रुजु होणे आवश्यक राहील. त्यांना कोणत्याही परिस्थितीत रुजु होण्यासाठी कालावधी वाढवुन दिला जाणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(वैद्य.मि.भा.निकुंभ)
अधिष्ठाता
शासकिय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव

Scanned with CamScanner